दि.31/01/2023

**<u>प्रसिध्दी पत्रक</u>**

आरोपी लोकसेवक 1. प्रदिप प्रल्हाद बाहेकर, वय 47 वर्षे, पद- लेखा अधिकारी, अतिरिक्त कार्यभार (प्रशासकीय अधिकारी) वाल्मी कार्यालय औरंगाबाद.

2. मोहन दशरथ शेलार, वय 52 वर्षे, पद-लेखाधिकारी वर्ग-2, वाल्मी औरंगाबाद रा. व्हिजन सिटी औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख रुपये 30000/- स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पो.ठाणे सातारा औरंगाबाद शहर गु.र.नं.37/2023 भ्र.प्र.अं.कायदा 1988 कलम 7,12. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | 1. प्रदिप प्रल्हाद बाहेकर, वय 47 वर्षे, पद- लेखा अधिकारी, अतिरिक्त कार्यभार प्रशासकीय अधिकारी वाल्मी कार्यालय औरंगाबाद. रा. प्लॉट नं.33 प्लॅट नं.7 पारीजातनगर एन-4 सिडको औरंगाबाद. (वर्ग-2)<br>2. मोहन दशरथ शेलार, वय 52 वर्षे, पद-लेखाधिकारी वर्ग-2, वाल्मी औरंगाबाद रा. व्हिजन सिटी औरंगाबाद (वर्ग-2) |
| लाच मागणी रक्कम | :- | 30000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 30000/- रुपये. |
| तपास अधिकारी | :- | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या मित्रांना वाल्मीमध्ये वाढीव काम मंजुर करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे मित्र कॉन्ट्रॅक्टर असुन त्यांनी वाल्मी कार्यालय औरंगाबाद अंतर्गत एकुण 11,50,000/-रुपयाचे काम मंजुर केले म्हणुन व आणखी रुपये 8,90,000/- काम मंजुर करण्यासाठी आरोपी लोकसेवक श्री. बाहेकर यांनी टक्केवारी प्रमाणे 30000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. बाहेकर यांनी 30000/- रुपये लाचेची मागणी करुन पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे दि.30/01/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. बाहेकर यांनी लाचेची रक्कम स्विकारण्यास आ.लो.से.क्रं. 2 शेलार यांना प्रोत्साहन दिल्यावरुन त्यांनी लाचेची रक्कम रुपये 30000/- पंच साक्षीदारा समक्ष व्हिजनसिटी, बिल्डींग समोर पैठणरोड कांचनवाडी औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह आ.लो.से.क्रं.01 व 02 यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे सातारा औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हनुमंत वारे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पो. अं. साईनाथ तोडकर, विलास चव्हाण,सुनील पाटील, चालक-सी.एन.बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

**(मारुती शंकर पंडित)**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.